# प्रेसनोट दि.०१/०७/२०१९

पुणे पोलीस आयुक्तालयातील पोलीस कर्मचा-यांचा पदोन्नती कार्यक्रम पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर येथे आज रोजी पार पडला. पोलीस शिपाई भरती झालेनंतर सेवानिवृत्ती पर्यत प्रत्येक पोलीस कर्मचारी २४ × ७ कर्तव्यावर हजर असतो. महत्वाचे गंभीर गुन्हयाचे अन्वेषण, प्रतिबंध कायदा व सुव्यवस्था प्रश्न सन, उत्सव व्हीआयपी बंदोबस्त अशा वेगवेगळया कारणामुळे पोलीस कर्मचारी आपल्या कुटुंबियापासुन दुर असतात. कुंटुंबातील महत्वाचे आनंदाचे क्षण त्यांचे पासुन दुर राहतात. अशा वेळेला कुटुंबातील वडीलधारी माणसे, पत्नी यांचे पाठबळावर संसाराचा रथ वाहुन नेला जातो. त्यामुळे पदोन्नती सारख्या आनंदाचे क्षणी तो केवळ शासकीय कार्यक्रम किंवा शासकिय औपचारीकता न ठेवता, कुटुंबियानाही या क्षणी समाविष्ट करुन घ्यावे ही संकल्पना मा. पोलीस आयुक्त डॉ.व्यंकटेशम सर यांनी मांडली. महाराष्ट्रात अशा प्रकारे कर्मचा-यांचा पदोन्नती कार्यक्रम घेण्याचा पहीलाच उपक्रम असून पोलीस कर्मचा-यांनी याचे मोठे स्वागत केले आहे.

याठिकाणी पुणे पोलीस आयुक्तालयामध्ये कार्यरत असणा-या ११६ पोलीस शिपाई ते पोलीस हवालदार यांना पोलीस नाईक ते पोलीस जमादार (सहा.पोलीस उपनिरीक्षक) अशी पदोन्नती देण्यात आली आहे. यावेळी कर्मचा-यांचे खांदयावर स्टार व फीत बांधण्याचा मान मा.पोलीस आयुक्त यांनी कर्मचा-यांचे नातेवाईकांना दिला.

आई-वडील, पत्नी, भाऊ, मुलगा व मुलगी यांनी स्टार अथवा फीत लावताना, कर्मचा-यांचे चेह-यावर समाधानाच्या व आनंदाच्या छटा उमटत होत्या. पदोन्नतीने कर्मचा-यांची जबाबदारी वाढली असुन, कर्मचा-यांचे जीवनामध्ये आनंदाचेही क्षण फुलवताना कर्मचा-यांनी आपल्या कुंटुंबियांचा प्राधान्याने विचार करुन सर्व आमिषांना दुर करत प्रामाणीक कर्तव्य बजावणे अपेक्षित आहे. यातुनच पोलीस दलाबाबत सर्वसामान्य नागरीकांमध्ये आपुलकी व विश्वास वाढणार आहे असे मत मा.पोलीस आयुक्त डॉ. व्यंकटेशम सर यांनी व्यक्त केले.

सदर कार्यक्रमाचे वेळी मा.पोलीस आयुक्त डॉ.व्यंकटेशम, अपर पोलीस आयुक्त,गुन्हे श्री.अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त श्री.तरवडे, पोलीस उप-आयुक्त,श्री.प्रसाद अक्कानवरु, श्री. बच्चनसिंग, श्री.मितेश घट्टे, श्री.प्रकाश गायकवाड, श्री.शिरीष सरदेशपांडे, श्रीमती.स्वप्ना गोरे व इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच पोलीस कर्मचारी यांचे नातेवाईक तसेच वेगवेगळया वर्तमानपत्रे व इलेक्ट्रॉनिक मिडीया यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन म.पो.उप.निरी.देवधर यांनी केले असुन, आभारप्रदर्शन पोलीस उप-आयुक्त,श्री.प्रसाद अक्कानवरु यांनी करून कार्यक्रमाची सांगता केली.







